आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com

वेर्णा, मंगळवार, १ एप्रिल २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 208 | Verna, | facebook.com/dainikherald | Tuesday 1 April 2025 | Pages 4 | ₹ 4



उघड्या कालव्यात पडून मृत्यू पान ३ वर



भारत-ऑस्ट्रेलिया मालिकेचे वेळापत्रक जाहीर! पान ४ वर

## निवडक

### दंतेवाडामध्ये चकमक; दोन दहशतवादी ठार

**छत्तीसगड, दि. ३१ :** छत्तीसगडच्या दंतेवाडामध्ये सुरक्षादल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली असून सुरू आहे. चकमकीत सुरक्षा दलाला मोठे यश मिळाले ाहे. या चकमकीत २५ लाख रुपयांचे बक्षीस असलेली महिला नक्षलवादी रेणुका उर्फ बानूचा खात्मा करण्यात सुरक्षा दलाला यश आले आहे.चकमकीत खातमा झालेल्या मृत महिला नक्षलवादीचे नाव रेणुका उर्फ मानू उर्फ चैते उर्फ सरस्वती असे आहे, ती वारंगल जिल्ह्यातील कडवेंडी येथील रहिवासी आहे. परिसरात चकमक आणि शोध मोहीम सुरू आहे. सुरक्षा दलाने घटनास्थाळाहून इन्सास रायफल आणि इतर शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. सुरक्षा दलाने सुरू केलेल्या नक्षवाद्यांविरोधातील मोहिमत २०२५ या वर्षात आतापर्यंत ११९ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. दंतेवाडाच्या गीदम पोलिस ठाण्याच्या हद्दीत आणि विजापूरच्या भैरमगड पोलीस ठाण्याच्या हद्दीत नेलगोडा, अकेली आणि बेलनार या सीमावर्ती गावांमध्ये सुरक्षा दलाच्या नक्षलविरोधी मोहिमा सुरू आहेत.

---

### डोनाल्डच्या धमकीला इराणचा ठेंगा

**वॉशिग्टन, दि. ३१ :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला थेट धमकी दिली होती. येत्या काही दिवसांत अमेरिकेबरोबर अणू करार करा अन्यथा बॉम्बहल्ले आणि शुल्कवाढीला सामोरे जा, असा कठोर इशारा ट्रम्प यांनी इराणला दिला होता. मात्र, इराणने ट्रम्प यांच्या धमकीला जुमानलेले नाही. उलट इराणी सैन्याने त्यांच्या देशावर हल्ला झाल्यास प्रत्युत्तर देण्यासाठी क्षेपणास्त्रे सज्ज केली आहेत.

इराणी सैन्याने देशभरात भूमिगत तळ बनवून तिथे ठेवलेली क्षेपणास्त्रे प्रक्षेपणासाठी सज्ज केली आहेत. हे भूमिगत तळ देशावरील कोणत्याही मोठ्या हल्ल्यांना तोंड देण्यासाठी तयार केले आहेत. दुसऱ्या बाजूला इराणच्या सर्वोच्च नेत्यानेही बदला घेण्याची धमकी दिली आहे. गेल्या आठवड्यात इराणने अमेरिकेशी थेट चर्चेसही नकार दिला होता. अमेरिकन व इराणी अधिकारी चर्चा करत आहेत. मात्र त्यावेळी ट्रम्प यांनी सविस्तर बोलणे टाळले होते.

---

### पंतप्रधान मोदींच्या तिवारी खासगी सचिव

**नवी दिल्ली, दि. ३१ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खासगी सचिवपदी निधी तिवारी यांची निवड करण्यात आली आहे. केंद्र सरकारने ही नियुक्ती केली असून याबाबतचे निवेदनही जारी केले आहे. निधी तिवारी या नोव्हेंबर २०२२ पासून पंतप्रधान कार्यालयात उपसचिव म्हणून कार्यरत आहेत. त्याआधी त्या परराष्ट्र मंत्रालयाच्या निरस्त्रीकरण आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा व्यवहार विभागात अवर सचिव होत्या. केंद्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, निधी तिवारी या २०१४ बॅचच्या भारतीय परराष्ट्र सेवा अधिकारी आहेत. त्या प्रामुख्याने परराष्ट्र व्यवहार, अणुऊर्जा आणि सुरक्षा व्यवहार यासह राजस्थान राज्याशी संबंधित कामकाज पाहत होत्या.

#### हवामान

कमाल : ३४ किमान : २४
आर्द्रता : ६३

#### बाजार भाव

सोने : ₹ ९१,९९५ (१० ग्रॅम)
चांदी : ₹ १,०४,१०० (१किलो)

#### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७७,४१४ .७७ ↑ (३१.१६ )
निफ्टी : २३,५१९.९० ↑ (८३.९५)

# ढवळीकर बंधूंवर मंत्री गावडेंचे थेट प्रहार

## मगो पक्षाचे नेतृत्व बदलून दाखविण्याचे गावडेंचे आव्हान

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ३१ :** राज्यातील सत्ताधारी भाजप आणि महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष (मगो) यांच्यातील संबंध ताणले जात असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी प्रियोळ येथील सभेत मगो पक्षाला अप्रत्यक्षरित्या घरचा आहेर दिल्यानंतर, क्रीडामंत्री गोविंद गावडे यांनी सोमवारी थेट ढवळीकर बंधूंवर निशाणा साधला. हिम्मत असेल तर मगो पक्षाचे नेतृत्व बदलून ते बहुजन समाजाच्या हाती सोपवा, असे खुले आव्हान गावडेंनी दिले आहे.

भाजपच्या नेत्यांनी मगो पक्षाला धारेवर धरल्याचे कार्यकर्त्यांच्या लक्षात आले आहे. लोकसभा निवडणुकीत मगोने भाजपला पाठिंबा दिला होता, मात्र विधानसभा निवडणुकीला दीड वर्ष बाकी असताना युतीत तणाव निर्माण झाल्याचे स्पष्ट होत आहे. मुख्यमंत्री सावंत दिल्लीत असून, मंत्रिमंडळ फेरबदलाच्या शक्यतेमुळे मगो पक्षाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

मंत्री गावडे यांनी मगोच्या सध्याच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मगो पक्ष हा बहुजनांचा पक्ष आहे, मग गेली अनेक वर्षे त्याचे अध्यक्षपद एका कुटुंबाकडेच का आहे ? जर मगो हा खऱ्या अर्थाने भाऊसाहेब बांदोडकरांच्या विचारांचा असता, तर अध्यक्षपद अन्य बहुजन नेत्याला सोपवले असते, असे थेट आव्हान त्यांनी ढवळीकर बंधूंना दिले.

सोमवारी पणजीत पत्रकार परिषदेत बोलताना गावडे म्हणाले की , भाऊसाहेब बांदोडकरांनी मगोला बहुजनांचा पक्ष म्हणून उभे केले होते, मात्र आज पक्ष फक्त काही मोजक्या नेत्यांच्या ताब्यात राहिला आहे. मगोच्या आमदारांमध्ये नेतृत्वगुण असताना अध्यक्षपद एकाच कुटुंबाकडे का ठेवले जात आहे? भाजप व काँग्रेससारख्या पक्षांत अध्यक्षपद बदलते, मग मगोमध्ये ते कायमस्वरूपी एका कुटुंबाच्या हातीच का ?

गावडे यांनी भाजप-मगो युतीवरही प्रश्न उपस्थित केला. भाजपला मगोची गरज नाही. फोंडा तालुक्यातील सर्व मतदारसंघात माझा प्रभाव आहे. जर भाजपने आदेश दिला, तर मी फोंड्यात भाजपचा विस्तार करण्याची जबाबदारी घेईन. भाजपने मगोबरोबर युती करण्याची गरज नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

त्यांनी मगोच्या नेत्यांवर टीका करताना, पूर्वी हेच नेते काँग्रेसचे एजंट होते. १९९९ मध्ये हे काँग्रेसच्या उमेदवारांसाठी प्रचार करत होते. आज हेच नेते मोठ्या आवाजात बोलत आहेत. मगोतील काही मंडळींनी माझ्यावर टीका करण्यापूर्वी विचार करावा, कारण त्यांच्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात मीच करून दिली होती, असा घणाघात केला.

गावडे यांनी सांगितले की, मगो हा पूर्वी बहुजनांचा पक्ष होता, पण आता तो

पान २ ▶



**मडगाव : पाजीफोंड येथे मुस्लीम बांधवांनी मोठ्या संख्येने एकत्र येत उत्साहात ईद साजरी केली. यावेळी हिंदू – मुस्लीम बांधवांनी एकमेकांना आलिंगन देत शुभेच्छा दिल्या . (मोहित खरंगटे )**

# जुन्या गोव्यातील ऐतिहासिक अवशेष नष्ट केल्याचा संशय

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ३१ :** जुने गोव्यातील वादग्रस्त स्थळावर ऐतिहासिक शस्त्रागाराचे कोणतेही अवशेष सापडले नसल्याने हे अवशेष ट्रक मधून इतरत्र वाहून नेण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अनेक वारसा अभ्यासक आणि इतिहासतज्ज्ञांनी यावर चिंता व्यक्त करत वारसास्थळांचे रक्षण करण्याच्या गरजेवर भर दिला आहे.

इतिहासकार प्रजल साखरदांडे यांनी याबाबत संवाद साधताना सांगितले की, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (एएसआय) आणि राज्य पुरातत्व विभागाच्या देखरेखीखाली असलेल्या जागतिक वारसा स्थळांवर अनधिकृत विकासकामांमुळे गंभीर धोका निर्माण झाला आहे. हे अत्यंत चिंताजनक असून, वारसास्थळांचे जतन करण्यासाठी अधिक प्रभावी उपाययोजना राबवणे गरजेचे आहे.

साखरदांडे पुढे म्हणाले की , गोव्याच्या ऐतिहासिक राजधानीच्या संवर्धनासाठी आम्ही अनेक वेळा लढा दिला आहे. मात्र, तटबंदीची भिंत, शस्त्रागार, तोफा, खांब, विहिरी आणि अन्य महत्त्वाची स्थळे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. २०१४ मध्ये आम्ही शस्त्रागार भिंतीच्या संरक्षणासाठी प्रयत्न केले होते. जुन्या गोव्यात अनेक ऐतिहासिक वास्तू आहेत, परंतु त्यांना कोणतेही कायदेशीर संरक्षण नाही. शस्त्रागार भिंतीचे उदाहरण घ्या– जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित भागात अशाप्रकारे कायद्याचे उल्लंघन कसे होऊ शकते? जागतिक वारसा स्थळांच्या नियमांनुसार, त्याच्या एका किलोमीटरच्या परिघात कोणताही विकासकाम करता येत नाही. मात्र, जुने गोवेत या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याची तक्रार तज्ज्ञांनी केली आहे. जगाच्या कोणत्याही भागात असे घडत नाही, पण जुन्या गोव्यात मात्र अनधिकृत विकासकामांसाठी मोकळीक आहे. पुरातत्व विभाग जबाबदारी झटकत असून, वारसा स्थळांवर वारंवार अतिक्रमण होत आहे,असे साखरदांडे म्हणाले.

संजीव व्ही. सरदेसाई यांनीही या स्थितीबाबत चिंता व्यक्त करत सांगितले की, जर एएसआय किंवा राज्य पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीशिवाय उत्खनन झाले असेल, तर अनेक

पान २ ▶

# मोठ्या प्रकल्पांसाठी क्षमता अभ्यास अनिवार्य करावा

## गावोगावच्या ग्रामसभांमधून वैज्ञानिक मूल्यांकनाची होतेय मागणी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

मडगाव, दि. ३१ : सासष्टी तालुक्यातील किनारपट्टीलगतची गावे आपल्या परिसरातील विकास नियोजनासाठी नव्या दृष्टिकोनाचा अवलंब करू लागल्याचे चित्र ग्रामसभांमधून दिसू लागले आहे. लक्झरी हॉटेल्स असोत वा मोठ्या गृहनिर्माण संकुलांचे मेगा प्रकल्प, स्थानिक पातळीवर त्याविरोधात वाढत्या प्रमाणात आवाज उठवला जात आहे. अशा परिस्थितीत ग्रामसभांनी आता अधिक ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली असून, ग्रामपंचायतींना कोणतेही मोठे प्रकल्प मंजूर करण्यापूर्वी वैज्ञानिक पद्धतीने क्षमता अभ्यास करण्याची मागणी केली जात आहे.

वार्का येथे ग्रामसभा बैठकीत मोठ्या प्रमाणावर विकासाविरोधात जोरदार चर्चा होत असतात. स्थानिक प्रशासनाचे निर्बंध डावलून अनेक विकासक थेट नगर नियोजन खाते (टीसीपी ), वीज विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आदी संस्थांकडून मंजुरी मिळवतात. परिणामी, पारंपरिक मार्गाने विकास रोखण्याचा ग्रामस्थांचा प्रयत्न अयशस्वी ठरतो.

गेल्या काही वर्षांत असेही आढळून आले आहे की, ग्रामपंचायतींनी कोणत्याही प्रकल्पास परवानगी देण्यास विलंब केला किंवा ती नाकारली, तरीही विकासक न्यायालयात जाऊन तांत्रिक कारणास्तव मंजुरी मिळवतात. त्यामुळे स्थानिकांचा विरोध व्यर्थ ठरतो.

या पार्श्वभूमीवर, प्रस्तावित क्षमतेच्या अभ्यासाचा उद्देश ग्रामपंचायतींना वैज्ञानिक आधार प्रदान करणे हा आहे. या अभ्यासाद्वारे मोठ्या विकास प्रकल्पांचा पाणीपुरवठा, रस्ते, वीजपुरवठा आणि अन्य पायाभूत सुविधांवरील संभाव्य ताण मोजता येईल. बाणावली मध्ये नुकत्याच झालेल्या ग्रामसभेतही याच मुद्द्यांवर चर्चा झाली. स्थानिकांनी अपुरे कचरा व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रियेचा अभाव आणि शेतकऱ्यांवर तसेच घरांवर होणाऱ्या परिणामांमुळे मोठ्या प्रकल्पांना विरोध दर्शवला. कार्मोणा येथे गावकरी जिल्हा विकास

पान २ ▶

# आगोंद , गालजीबाग किनारे ठरतायेत कासव संवर्धनाची नवी ठिकाणे!

## पर्यटन असूनही ऑलिव्ह रिडले कासवांच्या अंडी घालण्याच्या संख्येत वाढ अभ्यासात स्पष्ट


■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. ३१ :** दक्षिण गोव्यातील आगोंद आणि गालजीबाग समुद्रकिनाऱ्यांवर ऑलिव्ह रिडले कासवांच्या अंडी घालण्याच्या संख्येत वाढ झाल्याचे एका स्वतंत्र अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. पर्यटनाशी संबंधित मानवी हस्तक्षेप असूनही, या वाढीने पर्यावरणीय व्यवस्थापनाच्या दृष्टीने नवीन दृष्टिकोन पुढे आणला आहे.

केपे येथील सरकारी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील समाजशास्त्राच्या सहाय्यक प्राध्यापक प्रा. सायली कृष्णानंद गावकर यांनी २०२० ते २०२५ (आजपर्यंत) या कालावधीत आगोंद आणि गालजीबाग किनाऱ्यांवरील कासवांच्या घरट्यांची आकडेवारी नोंदवली आहे. त्यांच्या अभ्यासानुसार, आगोंद किनाऱ्यावर अंडी घालण्याच्या संख्येत सातत्याने वाढ होत असून, २०२० मध्ये आगोंद आणि गालजीबाग यांचे प्रमाण १.२–२:१ होते, जे २०२४ पर्यंत ४.१:१ इतके वाढले आहे.

२०२४ मध्ये आगोंद येथे १८,०११ अंडी नोंदली गेली, तर गालजीबाग येथे ४,३६९ अंडी आढळली. २०२५ साठीच्या अंदाजानुसार, आगोंद येथे १०,००० ते १४,००० अंडी आणि गालजीबाग येथे ३,००० ते ४,५०० अंडी असतील. या वाढीमुळे आगोंद किनारा कासवांच्या संवर्धनासाठी एक महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येत आहे.

गोव्यातील मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, पर्यावरणीय मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करणाऱ्या ६७ व्यवसायांना बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. १९७२ च्या वन्यजीव संरक्षण कायद्याअंतर्गत संरक्षित क्षेत्रात अनधिकृत व्यावसायिक विकास झाल्याच्या पार्श्वभूमीवर हा आदेश देण्यात आला आहे. या निर्णयामुळे स्थानिक पर्यटन व्यवसायांवर मोठा परिणाम झाला असून, अनेक व्यवसाय मालक आणि कर्मचाऱ्यांना आर्थिक अनिश्चिततेला सामोरे जावे लागत आहे.




स्थानिक व्यावसायिकांनी न्यायालयाच्या आदेशाविरोधात मूक निषेध नोंदवला. प्रा. गांवकर यांनी या निषेधात एक स्वतंत्र निरीक्षक म्हणून भाग घेतला आणि समाजाच्या प्रतिक्रियांचे दस्तऐवजीकरण केले. आगोंद बीचवरील ऑलिव्ह रिडले कासवांचे वाढते घरटे आणि पर्यटकांची उपस्थिती यात असलेल्या संतुलनाकडे लक्ष वेधले पाहिजे. मानवी हस्तक्षेप पर्यावरणासाठी हानिकारक असतो हा पारंपरिक दृष्टिकोन या अभ्यासातून आव्हानासमोर आला आहे. मात्र, जबाबदारीने व्यवस्थापित केल्यास पर्यटन आणि पर्यावरण संवर्धन हातात हात घालून जाऊ शकतात, असे त्यांनी नमूद केले.

गेल्या काही वर्षांत आगोंद किनाऱ्यावर ऑलिव्ह रिडले कासवांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. २०२४ मध्ये १८,०११ अंडी नोंदली गेली असून, यावरून असे दिसते की स्थानिक पर्यटन उपक्रमांनी कासवांच्या नैसर्गिक अधिवासात व्यत्यय आणला नाही.

आगोंदमधील अनेक कुटुंबांसाठी पर्यटन हा प्रमुख उत्पन्नाचा स्रोत असून, आतिथ्य, वाहतूक आणि अन्नसेवा यांसारख्या उद्योगांवर त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. तथापि, सीआरझेड (कोस्टल रेग्युलेशन झोन) उल्लंघनाच्या कारणावरून ६७ आस्थापने बंद करण्यात आल्याने या कुटुंबांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे.

गांवकर यांच्या अभ्यासानुसार, पर्यटन आणि पर्यावरणीय संरक्षण यांचा समतोल साधण्यासाठी नवीन धोरण आवश्यक आहे. संपूर्ण बंदी घालण्याऐवजी, अधिकारी एक सहयोगी चौकट राबवू शकतात, जी जबाबदार पर्यटनाला प्रोत्साहन देतानाच सीआरझेड नियमांचे पालन सुनिश्चित करेल, असे त्यांनी सुचवले.

आगोंद किनाऱ्यावरील कासव संवर्धनाचे यश हे दर्शवते की पर्यटन आणि पर्यावरण एकत्र वृद्धिंगत होऊ शकतात. शाश्वत पद्धतींना प्रोत्साहन देऊन आणि जैवविविधतेचे संरक्षण करणाऱ्या व्यवसायांना मदत करून, आगोंद इको-टुरिझमसाठी एक आदर्श मॉडेल ठरू शकते, असे त्यांनी नमूद केले.